संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)
जनसंपर्क विभाग

## विद्यापीठ उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कारासाठी अर्ज आमंत्रित
## ३१ मार्च २०२० पर्यंत अर्ज सादर करण्याचे विद्यापीठाचे आवाहन

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने विनियम क्र. २०१८ नुसार विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य, संचालक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांना उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार, तर नाविण्यपूर्ण उपक्रमासाठी संलग्नित महाविद्यालयास पुरस्कार देवून दरवर्षी १ मे रोजी गौरविल्या जाते. यावर्षी सुद्धा १ मे, २०२० रोजी उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार देवून त्यांचा यथोचित गौरव केला जाणार आहे. विद्यापीठस्तर व संलग्नित महाविद्यालये, स्वायत्त महाविद्यालये, मान्यताप्राप्त संस्था स्तर याशिवाय नाविण्यपूर्ण उपक्रमाबद्दल एका महाविद्यालयाला प्रोत्साहनपर रूपये ५००१/- रोख पुरस्कार व प्रशस्तीपत्र देवून गौरविल्या जाणार आहे.

विद्यापीठ स्तरामध्ये विद्यापीठातील शिक्षक, प्रथम श्रेणी अधिकारी, द्वितीय श्रेणी अधिकारी, तृतीय श्रेणी व चतुर्थ श्रेणी कर्मचारी, तर संलग्नित महाविद्यालये, स्वायत्त महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था स्तरामध्ये संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य वा संचालक, शिक्षक व सर्व स्तरावरील शिक्षकेत्तर कर्मचारी यापैकी एक यांना विद्यापीठाचा उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार देवून गौरविल्या जाणार असून प्रमाणपत्र, शाल व श्रीफळ आणि १०० ग्रॅम वजनाचे चांदीचे पदक असे पुरस्काराचे स्वरुप राहणार आहे.

विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य, शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांना विद्यापीठाच्यावतीने आवाहन करण्यात येते की, त्यांनी विद्यापीठाचा उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार २०२० व नाविण्यपूर्ण उपक्रमाबद्दल दिल्या जाणाऱ्या पुरस्कारासाठी आवेदनपत्र दिनांक ३१ मार्च, २०२० पर्यंत विद्यापीठामध्ये विहित प्रपत्रात सादर करावयाचे आहे. विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in या संकेतस्थळावर पुरस्कार संदर्भातील विनियम, स्वरुप, पुरस्कार अर्ज करण्याची पद्धत, पात्रता, वर्गवारी आदीं बाबतची सविस्तर माहिती दिलेली आहे.

अधिक माहितीसाठी आस्थापना विभागाचे उपकुलसचिव श्री प्रवीण राठोड यांचेशी संपर्क साधता येईल. तरी सर्व संबंधितांनी याची नोंद घ्यावी व आपले आवेदनपत्र विहित मुदतीत सादर करावे, असे आवाहन विद्यापीठाच्यावतीने कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांनी केले आहे.

---

प्रति,                                                                 **जनसंपर्क विभाग**
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी                                                दि. ०८/०२/२०२०.
दै.............................. अमरावती.

मा. महोदय,
आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी